# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१ दि.१३.१२.२०२२ अन्वये ए.एन.एम., जी. एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.२८.०१.२०२६ रोजी आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई, यांच्या दालनात सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.
२) उप सचिव तथा सदस्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
३) सहाय्यक संचालक, लेखा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४) अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
५) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ मुंबई.
६) श्री. कैलास गांधी निमंत्रित सनदी लेखापाल
७) श्रीमती. वैशाली बापट निमंत्रित परिव्यय लेखापाल

उपरोक्त बैठकीत उपस्थित मुद्दे व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे -

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| १ | शै.व. २०२५-२६ चा दाखल प्रस्तावाचा गोषवारा | एकूण संस्था (विनाअनुदानित)<br>एएनएम - ०६००<br>जीएनएम - ०७८८<br>एकूण अभ्यासक्रम - १३८८<br>A. एकूण Ad- hoc पात्र संस्था प्रस्ताव सादर -०३६८<br>B. एकूण ऑनलाइन प्रस्ताव सादर (No Upward) -०१५९<br>C. एकूण ऑनलाइन प्रस्ताव सादर (Upward) - ०७०८<br>एकूण सादर प्रस्ताव (A+B+C) - १२३५<br>हार्ड कॉपी जमा केलेले प्रस्ताव - ०६५९ (०४९ - pending )<br>आधापि सादर न झालेल्या प्रस्तावाची संख्या -०१५३<br>(ANM-१२२ GNM -३१) | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| २ | शै.व. २०२५-२६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन (REVIEW) शुल्क (४) मंजूर करणेबाबत. | शै.व. २०२५-२६ च्या शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन (REVIEW) शुल्कनिर्धारणसाठी आलेल्या ४ संस्थांपैकी -<br>१) १९२ होली फॅमिली इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, कुर्ला मुंबई GNM. - सदर संस्थेच्या उपस्थित प्रतिनिधीनी आपल्या संस्थेचे इलेक्ट्रिसिटि खर्च जास्त असून त्याबाबत मागील पाच वर्षातील बिल व कागदपत्र शुक्रवार पर्यंत सादर करावे.<br>मागील वर्षाचे शुल्क - रु. ६२०००<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु. ६२०००<br>समितीने सदर संस्थेच्या पुनर्विलोकनाबाबत कागदपत्रे तपासून निर्णय दिला जाईल असे ठरविण्यात आले.<br>२) ११८७ डीएसपीएम स्कूल ऑफ नर्सिंग, बाभळगाव, लातूर GNM.- उपस्थित प्रतिनिधीचे (संस्थाप्रमुख) शेरे लक्षात घेऊन व त्रुटि संदर्भातील सर्व कागदपत्राचा अभ्यास करून निर्णय दिला जाईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले.<br>मागील वर्षाचे शुल्क - रु. ४५०००<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु. ५७५००<br>समितीने सदर संस्थेच्या पुनर्विलोकनाबाबत कागदपत्रे तपासून निर्णय दिला जाईल असे ठरविण्यात आले.<br>३) २२१ महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था श्रीमती बकुल तांबट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन, कर्वेनगर पुणे GNM- सदर संस्थेच्या उपस्थित प्रतिनिधीनी आपल्या संस्थेचे खालील खर्च जास्त आहेत त्याबाबत सर्व कागदपत्र शुक्रवार पर्यंत सादर करावे.<br>-प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या वेतन संबधित स्पष्टीकरण | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | | - वेतनव्यतिरिक्त कॉलेजचे इतर खर्चाचे योग्य वर्गीकरण संबधित स्पष्टीकरण<br>- प्राचार्य व उपप्रचार्य यांच्या संदर्भातील भारतीय परिचर्या परिषदेचे मानक<br>- जाहिरात संबधित सर्व कागदपत्रे<br>मागील वर्षाचे शुल्क - रु. ८४०००<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु. ८२०००<br>समितीने सदर संस्थेच्या पुनर्विलोकनाबाबत कागदपत्रे तपासून निर्णय दिला जाईल असे ठरविण्यात आले.<br>४) ११४० मातोश्री स्कूल ऑफ नर्सिंग, एकलहरे, नाशिक GNM- सदर संस्थेच्या उपस्थित प्रतिनिधीनी आपल्या संस्थेचे खालील खर्च जास्त आहेत त्याबाबत सर्व कागदपत्र शुक्रवार पर्यंत सादर करावे.<br>- शिक्षकांची रुजुता व कार्यमुक्त अहवाल<br>- कर्मचाऱ्यांचे वेतन संबधित provision दर्शविलेली आहे त्याचे वेतन दिलेले कागदपत्र<br>- वेतनव्यतिरिक्त कॉलेजचे इतर खर्चाचे योग्य invoices and bills<br>मागील वर्षाचे शुल्क - रु. ४५०००<br>२०२५-२६ चे मंजूर शुल्क - रु. ५७५००<br>समितीने सदर संस्थेच्या पुनर्विलोकनाबाबत कागदपत्रे तपासून निर्णय दिला जाईल असे ठरविण्यात आले. | |
| ३. | समितीच्या कामकाजाकरीता लागणारे यंत्र सामुग्री / साधन सामुग्री खरेदी करण्याबाबत चर्चा व मंजूरी. | समितीच्या कामकाजाकरीता आवश्यक साधन सामुग्री खरेदी करण्याकरीता खालील पुरवठादारक ३ दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.<br>१) Rapid Technology PVT LTD.<br>२) Dynamic Technologies PVT LTD.<br>३) The Extreme Solution PVT LTD.<br>वरील प्राप्त दरपत्रकांचा तुलनात्मक अभ्यास करून पुढील बैठकीत निर्णय घेतला जाईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ४. | याचिका क्र. ७२२५/२४ या साठी नेमणूक केलेल्या वकीला बद्दल चर्चा व मंजूरी. | संदर्भ पपअशिशुस/या. क्र.७२२५/२०२४/५०/२०२४ दि. ३०/०७/२०२४ नुसार ॲड. श्री. मृगेश नरवाडकर, उच्च न्यायालय, औरंगाबाद यांची विधी सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली होती परंतु काही दिवसांपासून त्यांच्याशी संपर्क होत नसल्याने समितीने त्यांच्या कडून याचिका काढून घेवून, नवीन ॲड. श्री. संदीप डेरे, उच्च न्यायालय, औरंगाबाद यांची विधी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात यावी आहे असे सर्वानुमते ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| | श्री रमेश पाडावे कार्यालयीन अधीक्षक (कंत्राटी पद्धतीने ) या पदावर मुदतवाढ देणेबाबत. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीचे कामकाज सुरळीत ठेवण्या करिता श्री. रमेश पाडावे यांना कार्यालयीन अधीक्षक (कंत्राटी पद्धतीने ) या पदावर दि १/०२/२०२६ पासून ०३ महिन्याकरीता मुदतवाढ देण्याचे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल.
उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ तथा सदस्य

अधिक्षिका,
शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, तथा सदस्य

सहाय्यक संचालक, लेखा,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
तथा सदस्य

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

उप सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
तथा सदस्य सचिव

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
तथा अध्यक्ष